# जोरदार मोदी; शिवसेनेकडून मोदींचे कौतुक!

**मुंबई** - शिवसेनेने सामनातील अग्रलेखातून हिंदुस्थानचे पंतप्रधान जोरात असून जग पादाक्रांत करण्याच्या मोहिमेवर ते निघाले आहेत. त्यांचे अभिनंदन व शुभेच्छा! असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक केले आहे.

अग्रलेखात म्हटले आहे की, मोदी विदेश दौऱ्यावर आहेत व ते अमेरिकेत जाऊन काय करतात व बोलतात याकडे अनेकांचे लक्ष लागले होते. मोदी यांच्या भाषणात जोर होता. हिंदुस्थानी लोकांना चांगले इंग्लिश बोलता येत नाही. हिंदुस्थानी मंडळी कसे गमतीदार उच्चार करतात, याच्या नकला अमेरिकेतील राष्ट्राध्यक्षपदाचे उमेदवार मि. ट्रम्प करीत होते, पण त्यांच्याच संसदेत हिंदुस्थानचे पंतप्रधान मोदी यांनी भारतीय इंग्रजीत भाषण केले व मोदी यांच्या भाषणास वाक्यागणिक टाळ्यांचा कडकडाट करून आणि उभे राहून सिनेट सदस्य त्यांना जोरदार प्रतिसाद देताना दिसत होते.

अमेरिकेन संसदेत मिळालेला प्रतिसाद मोदी यांच्या लोकप्रियतेची पावती असल्याचे अग्रलेखात म्हटले आहे. तसेच परदेशात जातील तिथे मोदी यांचे अती जंगी स्वागत व शाही सोहळे साजरे होत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर मेरा देश बदल रहा है या म्हणण्यावर माना डोलावल्या जात आहेत व जग आता हिंदुस्थानला मानसन्मान देत आहे. मोदी यांनी हे सर्व अथक परिश्रमाने घडवून आणले याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ओबामा हे पंतप्रधान मोदी यांचे चांगले दोस्त बनले आहेत.

२०२२ पर्यंत प्रत्येक गावात इंटरनेट उपलब्ध होईल. १०० स्मार्ट शहरे निर्माण करू, अशी माहितीही मोदी यांनी अमेरिकन काँग्रेससमोर दिली आहे. त्यामुळे येथील काँग्रेसजनांनी आदळआपट करायची गरज नाही. अमेरिकेतून श्री. मोदी हे मेक्सिको देशात उतरले असून तेथेही हिंदुस्थानच्या पंतप्रधानांचे नेत्रदीपक स्वागत झाले. इतकेच नव्हे तर मेक्सिकोच्या राष्ट्राध्यक्षांनी मोदी यांच्यासाठी स्वतः ड्रायव्हिंग करून एक प्रकारे गौरवाचे शिखर गाठले. असे म्हणत शिवसेनेने मोदींचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या आहेत

# तेराशे कोटींच्या कंत्राटांची चौकशी



**मुंबई** : शहरातील रस्त्यांच्या कामात झालेल्या भ्रष्टाचाराप्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या सहा कंत्राटदारापैकी दोघांना तेराशे कोटींची नवीन कामे दिल्याप्रकरणी मुंबई महापालिका अडचणीत येण्याची शक्यता आहे.

याप्रकरणाची सविस्तर चौकशी करण्याचे आदेश लोकायुक्त एम. एल. टाहिलियानी यांनी दिले आहेत. आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी केलेल्या मागणीनुसार त्यांनी याबाबत चौकशी सुरु केली आहे. रस्त्याच्या कामातील भ्रष्टाचार व गैरव्यवहाराप्रकरणी पालिकेने सहा कंत्राटदारांवर गुन्हे दाखल केले होते. त्यापैकी आरपीएस इन्फ्रा प्रोजेक्ट आणि जे. कुमार यांना हँकॉकसह यारी रोड, मिठी नदी आणि विक्रोळी उड्डाणपूलाचे नवीन कंत्राट देण्यात आले. तसेच गोरेगाव-मुलुंड लिंक रोड ही १३०० कोटींची कामे देण्यामागील प्रशासनाचा हेतूबाबत संशय निर्माण होतो, त्यामागे भ्रष्ट अधिकारी-लोकप्रतिनिधींची साखळी असण्याची शक्यता गलगली यांनी वर्तविली होती. त्यांच्या मागणीनुसार लोकायुक्तांनी पालिकेकडून त्याबाबत अहवाल मागविला असून चौकशी सुरू केली असल्याचे गलगली यांनी सांगितले

# मुळात सेन्सॉर बोर्डाची गरजच काय?

चित्रपट-नाटकांना सेन्सॉरच्या कात्रीची गरज आहे की नाही, हा वाद जुनाच आहे. कधीकाळी तयार केलेल्या नियमांनुसार सरकारने नेमलेली एखादी व्यक्ती चित्रपट-नाटकांना कात्री लावते आणि त्यातून दरवेळी वाद तयार होतात. सेन्सॉर हवे की नको हाच प्रत्येक वादाचा केंद्रबिंदू असतो. आता हा प्रश्न नव्याने समोर आला आहे तो उडता पंजाब या आगामी चित्रपटाच्या निमित्ताने..

अभिषेक चौबे दिग्दर्शित या उडता पंजाबमध्ये पंजाबमधील अंमली पदार्थांवर भाष्य केले आहे. पण सेन्सॉर बोर्डाने चित्रपटाच्या नावातून पंजाब वगळणे आणि चित्रपटातूनही पंजाबचा उल्लेख वगळण्याचा अनालकनीय निर्णय दिला. शिवाय ८९ कट्सही सांगितले. या निर्णयांना खरंच काही अर्थ आहे का? उडता पंजाबच्या नावातून पंजाब वगळल्याने तेथील परिस्थिती बदलणार आहे का असे असंख्य प्रश्न गेले काही दिवस विचारले जात आहेत.. पण त्याहीपेक्षा एक मूळ प्रश्न विचारण्याची गरज आहे.. सेन्सॉर बोर्ड हवे आहे का? आणि याचा पूरक प्रश्न म्हणजे सेन्सॉर बोर्ड आवश्यक असेल, तर त्याच्या कामाचे स्वरूप काय असावे? सेन्सॉर बोर्ड आणि त्याची गरज, त्याचे काम या विषयावर कलाकार मंडळी आणि राजकीय मंडळी त्यांच्या त्यांच्या सोयीनुसार भूमिका सतत घेत असतातच. आता सर्वसामान्यांनी त्यांची भूमिका मांडायची गरज आहे आणि त्यासाठी उपलब्ध आहे सकाळचे व्यासपीठ..

# मान्सूनची समाधानकारक वाटचाल

## आंध्रप्रदेशात दाखल

केरळच्या किनारपट्टीला बुधवारी धडक देणाऱ्या नैऋत्य मोसमी पावसाची समाधानकारक वाटचाल सुरू असून, गुरुवारी मान्सून आंध्रप्रदेशच्या किनारपट्टीच्या भागात दाखल झाला.

येत्या एक-दोन दिवसांत आंध्रप्रदेशच्या इतर भागांमध्येही मान्सून सक्रीय होण्याची शक्यता आहे, असे भारतीय हवामान खात्याकडून सांगण्यात आले. मान्सूनने गुरुवारी आंध्रप्रदेशच्या दक्षिण किनारपट्टीपासून रायलसीमा भागातील अनंतपूरला आपल्या कवेत घेतले. येत्या



चार-पाच दिवसांत संपूर्ण तेलंगणात मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे, असे भारतीय हवामान खात्याचे हैदराबाद येथील संचालक वाय. के. रेड्डी यांनी याबाबत माहिती देताना सांगितले. रायलसीमा आणि आंध्रप्रदेशच्या किनारपट्टीच्या काही भागात पाऊस झाला. रायलसीमातील जमालमाडुगू आणि पुंगानूर येथे प्रत्येकी सात मिमी पावसाची नोंद झाली. तेलंगणातही काही ठिकाणी मान्सूनपूर्व पावसाच्या सरी कोसळल्या. निझामाबाद जिल्ह्यातील मदनूर येथे आठ मिमी आणि जुक्कल येथे सात मिमी पावसाची नोंद झाली.

# एनएसजी'साठी हिंदुस्थानला मेक्सिकोचाही पाठिंबा

## ■ मेक्सिकोचे राष्ट्राध्यक्ष मोदींचे सारथी

पंतप्रधान मोदी सध्या मेक्सिको दौऱ्यावर आहेत. हिंदुस्थान आणि मेक्सिको यांच्यात विविध क्षेत्रांतील सहकार्याबाबतचे करारमदार झाल्यानंतर राष्ट्राध्यक्ष एनरिक पेना निटो यांनी पंतप्रधान मोदी यांना डीनरसाठी क्विंटोनील' या रेस्टॉरंटमध्ये नेले. त्यावेळी निटो यांनी स्वतः गाडी चालवून मोदी यांचे सारथ्य केले. त्या दोघांनीही शाकाहारी भोजन घेतले. राष्ट्राध्यक्ष निटो हे मोदींसाठी गाडी चालवतानाचे आणि रेस्टॉरंटमध्ये गप्पा मारतानाचे दोघांचे फोटो परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते विकास स्वरूप यांनी ट्विटरवर लगेच झळकवले.

- ऊर्जा, ऑटोमोटिव्ह, फार्मा कृषी, संशोधन, जैविक, तंत्रज्ञान, कचरा, व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन, सौरऊर्जा प्रकल्पांत हिंदुस्थान आणि मेक्सिको एकमेकांची मदत घेणार आहेत.

मेक्सिको सिटी, दि. ९ (वृत्तसंस्था) - आण्विक पुरवठादार गटातील म्हणजेच एनएसजी-न्यूक्लियर सप्लायर्स ग्रुपमधील हिंदुस्थानच्या सदस्यत्वाला अमेरिका, स्वित्झर्लंडपाठोपाठ मेक्सिकोनेही आज पाठिंबा दिला. यासंदर्भात हिंदुस्थानचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मेक्सिकोचे राष्ट्राध्यक्ष एनरिक पेना निटो यांनी संयुक्त निवेदन प्रसृत केले.

४८ सदस्यसंख्या असलेल्या एनएसजी'मधील हिंदुस्थानच्या सदस्यत्वाच्या दाव्याला पाठिंबा दिल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी मेक्सिकोचे खास आभार मानले आहेत. हिंदुस्थानला मेक्सिकोसोबत असलेले संबंध आणखी दृढ करायचे आहेत असे त्यांनी नमूद केले.



**मेक्सिकोत मोदींचे जंगी स्वागत**

चार देशांचा दौरा केल्यानंतर पंतप्रधान मोदी हे पहाटे ४ वाजून ४२ मिनिटांनी मेक्सिकोत दाखल झाले. विमानतळावर मेक्सिकोचे परराष्ट्रमंत्री क्लॉडियो मॉसियू यांनी त्यांचे स्वागत केले. तर हिंदुस्थानी वंशाच्या नागरिकांनी भारतमाता की जय'च्या घोषणा देत त्यांचे स्वागत केले, तर मेक्सिकोचे राष्ट्राध्यक्ष निटो यांनी खास ट्विट करून हिंदुस्थानच्या पंतप्रधानांचे स्वागत केले. मेक्सिकोत आपले स्वागत आहे. हा आमच्यासाठी मोठा सन्मानाचा क्षण आहे. आपली ही भेट सुफळ संपूर्ण ठरेल असा विश्वास मला आहे, असे मेक्सिकोच्या पंतप्रधानांनी ट्विटमध्ये म्हटले होते. १९८६ साली तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी मेक्सिकोचा दौरा केला होता. तसेच २०१२ सालात जी-२० समिटसाठी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे मेक्सिकोला गेले होते. त्यानंतर त्या देशाच्या दौऱ्यावर गेलेले मोदी हे हिंदुस्थानचे दुसरे पंतप्रधान आहेत. त्यांच्या या दौऱ्यामुळे मेक्सिको हा देश तब्बल ३० वर्षांनंतर हिंदुस्थानच्या अजेंड्यावर आला आहे.

**राज्यघटना हिंदुस्थानचा पवित्र ग्रंथ : पंतप्रधान**

वॉशिंग्टन : हिंदुस्थानच्या राज्यघटनेला माझे सरकार पवित्र ग्रंथ मानते असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकन काँग्रेसमधील आपल्या ऐतिहासिक भाषणात सांगितले. श्रद्धेचे स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, मतदानाचा अधिकार आणि सगळ्यांना समानता हे मूलभूत अधिकार आमच्या राज्यघटनेने बहाल केलेले आहेत, असे त्यांनी यावेळी आवर्जून नमूद केले. हिंदुस्थानच्या निर्मात्यांनी आधुनिक राष्ट्राची उभारणी केली आहे. स्वातंत्र्य, लोकशाही, समता ही मूल्ये त्याचा आत्मा आहेत, असे प्रतिपादन पंतप्रधानांनी यावेळी केले. हिंदुस्थान आज एकजुटीने उभा आहे, एकजुटीने विकास करतो आहे आणि एकजुटीनेच जल्लोष करतो आहे, असे मोदी म्हणाले.

हिंदुस्थान आणि मॅक्सिको यांच्यातील संबंध केवळ विक्रेता आणि खरेदीदार एवढ्यापुरतेच मर्यादित राहणार नाहीत तर ही भेट अधिक सुफळ संपूर्ण ठरेल, असा मला विश्वास आहे.

# अमेरिकेसाठी पाक केवळ 'कामापुरता मामा'

**इस्लामाबाद** - अणुपुरवठादार गटात भारताला सामील करण्यासाठी अमेरिकेने भक्कम पाठिंबा दिल्याच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेसाठी पाकिस्तान हा केवळ गरजेपुरता असल्याची टीका पाकिस्तानचे परराष्ट्र विभागाचे सल्लागार सरताज अझीझ यांनी केली आहे.

अमेरिकेने अणुपुरवठादार गटात सामील करण्यासाठी भारताला पाठिंबा दिल्यानंतर पाकिस्तानमधून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. पाकमधील विविध माध्यमांनीही भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परराष्ट्र नीतीचे कौतुक करण्यात येत असून अशा प्रकारची नीती पाकिस्तान का वापरत नाही? असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. अणुपुरवठा गटात भारताचा समावेश केल्यास पाकिस्तान आपली चिंता अमेरिकेला कळवेल, तसेच यासंदर्भात येत्या १० जून रोजी पाकिस्तान आणि अमेरिकेदरम्यान एक उच्चस्तरीय बैठक असल्याचे अझीझ यांनी सांगितले.



मंगळवारी अमिरीकेचे अध्यक्ष बराक ओबामा आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातील बैठकीदरम्यान अमेरिकेने अणुपुरवठादार गटात सामील होण्यासाठी भारताला पाठींबा दर्शविला आहे. दोन्ही देशांनी या भेटीत सुरक्षा आणि संरक्षण सहकार्याबाबत कराराही केला आहे. दरम्यान अणुपुरवठादार गटात भारताचा समावेश होऊ नये आणि त्या ऐवजी पाकिस्तानची तिथे वर्णी लागावी यासाठी पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय स्तरावर मोर्चेबांधणी आणि मुत्सद्देगिरीचे पराकोटीचे प्रयत्न सुरू केले आहेत.

# राष्ट्रवादी'चा १७ वा वर्धापन दिन संपन्न

मुंबई - सोळा वर्षांच्या राजकीय प्रवासात पंधरा वर्षे सत्तेत असलेला राष्ट्रवादी काँग्रेसचा शुक्रवारी (ता.१०) सतरावा वर्धापन दिन साजरा होत आहे. त्यानिमित्त मुंबईत पक्षाचा मेळावा होणार आहे. सोळावं वर्ष अत्यंत धोक्याचं या उक्तीप्रमाणे मागील वर्ष राष्ट्रवादी काँग्रेसला राजकीय दणका बसला होता. विधानसभेत चौथ्या क्रमांकाच्या जागा मिळाल्याने पक्षाची मोठी पडझड झाल्याचे चित्र होते. प्रमुख नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप अन् छगन भुजबळ यांची अटक यानंतर तर राष्ट्रवादीसमोर मोठे आव्हान उभे राहिले होते. त्यातही पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी दुष्काळी भागात दौरे करून कार्यकर्त्यांना नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे उद्याच्या मेळाव्यात पवार काय बोलतात, कोणता कार्यक्रम पक्षाला देतात, सरकारच्या कारभाराबाबत त्यांची भूमिका काय, याबाबतची उत्सुकता शिगेला पोचली आहे.

'न्यायस्वातंत्र्य समता' हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक रमेश अभिमन्यू शेळके यांनी यश एन्टरप्राईजेस डी १४ साई सयाजीनगर वारजे, पुणे ४११०५८ येथे छापून सर्व्हे नं. ४/१२, महात्मा फुले वसाहत कोंढवा, खुर्द, कमेला, पुणे ४११०४८ येथून प्रकाशित केले.

या साप्ताहिकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

वादविवाद पुणे न्यायकक्षेत, अन्यत्र कोठेही नाही.